पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

मा.स्थायी समिती

**कार्यपत्रिका क्रमांक – १८९**

(सभावृत्तांत)

**दिनांक – १६/०९/२०२०** **वेळ – दु. ०२.३० वा.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या **मा.स्थायी** समितीची **साप्ताहिक** सभा **बुधवार** दिनांक **१६/०९/२०२०** रोजी **दु.०२.३० वा.** महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सदर सभेत खालील प्रमाणे सन्मा. सदस्य सभागृहात उपस्थित होते. तसेच काही सन्मा. सदस्य व्हीडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे सहभागी झाले होते.

१. **मा.संतोष (आण्णा) ज्ञानेश्वर लोंढे – सभापती**
२. *मा.चोंधे आरती सुरेश
३. मा.शितल उर्फ विजय गोरख शिंदे
४. मा.लांडगे राजेंद्र किसनराव
५. मा.पंकज दत्तात्रय भालेकर
६. मा.कलाटे राहूल तानाजी
७. *मा.बारणे झामाबाई बाळासाहेब
८. मा.कांबळे अंबरनाथ चंद्रकांत
९. मा.संतोष बबन कांबळे
१०. मा.अभिषेक गोविंद बारणे
११. *मा.फुगे भिमाबाई पोपट
१२. मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे
१३. मा.सुलक्षणा राजू धर

या शिवाय मा.पाटील - अति.आयुक्त(१), मा.पवार – अति.आयुक्त (२), मा.तुपे – प्र.अति.आयुक्त(३) तथा सह शहर अभियंता (वि/यां), मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.इंगळे – उपआयुक्त, मा.राजन पाटील – शहर अभियंता, मा.डॉ.रॉय – आरोग्य वैद्यकिय अधिकारी, मा.भालकर, मा.सवणे, मा.तांबे – सह शहर अभियंता, मा.जोशी, मा.खांडेकर, मा.झगडे, मा.लोणकर, मा.बोदडे, मा.खोत – सहाय्यक आयुक्त, मा.गायकवाड – प्र.मुख्य उद्यान अधिक्षक, मा.डॉ.साळवे – अति.आरोग्य वैद्यकिय अधिकारी, मा.डॉ.वाबळे – अधिष्ठाता YCMH, मा.पाटील, मा,वाघुंडे, मा.काळे – कार्यकारी अभियंता, मा.जरांडे - सुरक्षा अधिकारी, मा.गोफणे – आरोग्य अधिकारी हे अधिकारी सभागृहात उपस्थित राहून तसेच मा.कुंभोजकर – मुख्य लेखा परिक्षक, मा.कोळंबे – मुख्य लेखा व वित्त अधिकारी, मा.निकम – सह शहर अभियंता, मा.दुरगुडे – सहाय्यक आयुक्त, मा,मुंढे – प्र.शिक्षणाधिकारी, मा.जुंधारे, मा.मोरे, मा.पोरेड्डी मा.टकले – कार्यकारी अभियंता हे अधिकारी व्हीडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे सहभागी झाले होते.

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले.**

विषय क्र.३१) आण्णासाहेब मगर स्टेडियम येथील PMRD Cpvod Hospital करिता आवश्यक वैद्यकिय ऑक्सिजन द्रव गॅसचा O2 पुरवठा करणेबाबत.

विषय क्र.३२) सन २०२०-२१ च्या अंदाजपत्रकीय तरतूदीत वाढ/ घट करणेबाबत. – मा.राजेंद्र लांडगे, मा.शितल शिंदे यांचा प्रस्ताव

विषय क्र.३३) निविदा कालावधी दुरूस्तीबाबत. - मा.राजेंद्र लांडगे, मा.शितल शिंदे यांचा प्रस्ताव

विषय क्र.३४) भारतरत्न मौलाना अब्दुल कलाम आझाद यांची जयंती मोठ्या प्रमाणात साजरी करणेबाबत - मा.राजेंद्र लांडगे, मा.शितल शिंदे यांचा प्रस्ताव

विषय क्र.३५) मनपाचे से.२६ शुभम पार्क उद्यान, विरंगुळा केंद्र व अडव्हेंचर पार्क उद्यान देखभाल व संरक्षण कामाबाबत. - मा.राजेंद्र लांडगे, मा.शितल शिंदे यांचा प्रस्ताव

विषय क्र.३६) Tab Azithromycin 500 mg व Tab. Paracetamol 500 mg चे खरेदीस येणा-या खर्चास मान्यता मिळणेबाबत. - मा.राजेंद्र लांडगे, मा.शितल शिंदे यांचा प्रस्ताव

विषय क्र.३७) महानगरपालिका कर्मचारी/अधिकारी/सेवानिवृत्त कर्मचारी यांचेसाठी धन्वंतरी योजना चालू ठेवणेबाबत. – मा.राहुल कलाटे, मा.शितल शिंदे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.३८) कोरोना विषाणू प्रसारावरील उपाययोजना दरम्यान (१९ कोविड) कार्यरत असणा-या कर्मचा-यांना प्रोत्साहन भत्ता लागू करणेबाबत – मा.शितल शिंदे, मा.राजेंद्र लांडगे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.३९) कोविड-१९ नियंत्रणासाठी माझे कुटुंब–माझी जबाबदारी या मोहिमेच्या अंमलबजावणी करीता स्वयंसेवक यांचे मानधनाबाबत – मा.शितल शिंदे, मा.पंकज भालेकर यांचा प्रस्ताव.

----------

**खालील प्रमाणे सुचना मांडणेत आली.**

सुचक – मा.राजेंद्र लांडगे अनुमोदक – मा.शितल शिंदे

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे माजी नगरसेवक वसंतराव वाणी तसेच शहरातील करोनामुळे निधन झालेल्या यक्तींना श्रध्दांजली वाहण्यात यावी.

सदर सूचना सर्वानुमते मान्य झाली.

----------

(सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली)

----------

अ) दिनांक २६/०७/२०२० रोजी (दु.२.३० वा), दि.२७/०८/२०२० रोजी (दु.२.३० वा), दि.०२/०९/२०२० रोजी (दु.२.१५ वा) व दि.०९/०९/२०२० रोजी (दु.२.०० वा), झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक १८६) सभावृत्तांत कायम करणेत आलेचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

आ) दिनांक ०२/०९/२०२० रोजी (दु.२.३० वा), व दि.०९/०९/२०२० रोजी (दु.२.१५ वा), झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक १८७) सभावृत्तांत कायम करणेत आलेचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

इ) दिनांक ०९/०९/२०२० रोजी (दु.२.३० वा) झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक १८८) सभावृत्तांत कायम करणेत आलेचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

---------

ठराव क्रमांक – ७४४८ विषय क्रमांक – ०१

दिनांक – १६/०९/२०२० विभाग – स्थापत्य ब मुख्यालय

सुचक – मा.अभिषेक बारणे अनुमोदक – मा.राजेंद्र लांडगे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.स्था/नि/२-ब/३२१/२०२०, दि.०३/०७/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.82/1/2019-20 अन्वये चिंचवड येथील मंगलमुर्ती वाडा, चाफेकर शिल्पसमूह, मोरया गोसावी मंदिर पासूनचे थेरगाव बोटक्लब पर्यंतचा परिसर सुशोभिकरण करणेकामी (टप्पा-२) मे.एच.सी.कटारिया नि.र.रू.11,55,48,843/- (अक्षरी र.रू.अकरा कोटी पंचावन्न लाख अठ्ठेचाळीस हजार आठशे त्रेचाळीस फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.11,50,25,043/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.11,50,25,043/- पेक्षा 22.06% कमी म्हणजेच र.रु.8,96,50,519/- + रॉयल्टी चार्जेस र.रु.0/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.5,23,800/- = एकुण र.रु.9,01,74,319/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७४४९ विषय क्रमांक – ०२

दिनांक – १६/०९/२०२० विभाग – इ क्षेत्रिय, जलनि:सारण

सुचक – मा.अभिषेक बारणे अनुमोदक – मा.संतोष कांबळे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.इक्षेका/जनि/कावि/७३९/२०२०, दि.३१/०८/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिका इ क्षेत्रिय कार्यालय हद्दीतील मलनि:सारण नलिका मॅनहोल चेंबर्सची सफाई आधुनिक यांत्रिकी पध्दतीने करणेकामी (सक्शन जेटींग सह रिसायकलींग मशिनच्या सहाय्याने) मे.मेट्रो वेस्ट हॅन्डलिंग प्रा. लि. यांना मा.स्थायी समिती ठराव क्र.४६७६ दिनांक २८/०२/२०१९ नुसार करारनामा शर्तीनुसार दि.२५/०७/२०१९ च्या आदेशान्वये कामाचे आदेश देणेत आलेले होते. सदर कामाची

मुदत दिनांक २४/०७/२०२६ पर्यंत आहे. निविदा अटी व शर्ती (A) क्र.३ नुसार सदर निविदेतील दर हे निविदा कालावधी पर्यंत कायम राहतील. तसेच अट क्र.३२ नुसार त्या कालावधीत भाववाढ फरक देय राहील. सदर निविदेचा कार्य कालावधी ०७ (सात) वर्षे आहे. तथापि कामाचा आदेश व करारनामा हा ०१ (प्रथम) वर्षासाठी करणेत आलेला आहे. त्यानंतर कामाची प्रगती, Performance विचारात घेऊन पुढील प्रत्येक वर्षासाठी मा.स्थायी समितीच्या मान्यतेने मुदतवाढ देणेत येईल. तसेच निविदा अटी व शर्तीनुसार भाववाढ फरक देय राहील असे आहे. त्यानुसार ठेकेदाराने सदरचे काम प्रथम वर्षात समाधानकारक पूर्ण केलेले आहे. द्वितीय वर्षासाठी (२४.०७.२०२१ पर्यत) मा.स्थायी समितीची मंजुरी प्राप्त करणे आवश्यक आहे. सदर कामासाठी सन २०२०-२१ चे अंदाजपत्रकात पान क्र.८९४ अ. क्र. इ वर र.रू.१,१८,००,०००/- (अक्षरी र.रू.एक कोटी अठरा लाख फक्त) तरतुद नमूद करणेत आलेली आहे. निविदा अटी व शर्ती (A)क्र.३ नुसार मा. स्थायी समितीने ठरावात नमूद केलेला १ वर्षे कालावधीची मुदत दिनांक २४/०७/२०२० रोजी पुर्ण होत आहे. वर नमूद केलेनुसार ठेकेदार मे. मेट्रो वेस्ट हॅन्डलिंग प्रा. लि.यांस पिंपरी चिंचवड महानगरपालिका इ क्षेत्रीय कार्यालय हद्दीतील मलनिःसारण नलिका मॅनहोल चेंबर्सची सफाई आधुनिक यांत्रिकी पद्धतीने करणे (सक्शन, जेटींग सह रिसायकलिंग मशिनच्या सहाय्याने) या कामास दिनांक २५/०७/२०२० पासून २४/०७/२०२१ पर्यंत द्वितीय वर्षासाठी मुदतवाढ देणेस व या कालावधीसाठी र.रू.१,२९,११,७००/- (अक्षरी र.रू.एक कोटी एकोणतीस लाख अकरा हजार सातशे फक्त) च्या खर्चास व भाववाढ फरक देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७४५० विषय क्रमांक – ०३

दिनांक – १६/०९/२०२० विभाग – सुरक्षा

सुचक – मा.अंबरनाथ कांबळे अनुमोदक – मा.संतोष कांबळे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.सुवि/३/कावि/३९८/२०२०, दि.२६/०८/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

सुरक्षा विभागामार्फत ठेकेदारी पदध्तीने सुरक्षा व्यवस्था या उपक्रमान्वये सुरक्षा व्यवस्था करणेकामी ईनिविदा सुचना क्र.२/२०१६-१७ अन्वये ठेकेदारी पध्दतीने मनपा कार्यक्षेत्रातील मनपाचे मिळकतींचे सुरक्षेकामी मे.नॅशनल सिक्युरीटी सर्व्हीसेस यांना आदेश क्र.सुवि/३/ कावि/२८८/२०२० दि.१६/०६/२०२० अन्वये कामकाज आदेश देणेत आलेले आहे.

**दर तपशील**

| अ.क्र. | ई-निविदा | मुळ वेतन (एप्रिल २०१८) | महागाई भत्ता (जाने २०२०) | एकूण किमान वेतन दर |
|---|---|---|---|---|
| १ | सुरक्षा विभाग ई-निविदा सुचना क्र. २/२०१६-२०१७ रखवालदार मदतनीस | ११५००/- | ५२५०/- | २३४७१/- |

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील व बाहेरील लगतच्या कोविड केअर सेंटर वर कोरोना विषाणू (कोविड-१९) आजाराने ग्रस्त रुग्ण अथवा Quarantine मध्ये देखरेखी खालील ठेवलेले नागरिक

पळून जाऊ नयेत यासाठी कोविड केअर सेंटर वर नियंत्रण ठेवणेकामी मा.आयुक्त सो व मा.अति आयुक्त(२) यांचेशी झालेल्या चर्चेनुसार व दिनांक २४/०८/२०२० रोजीच्या प्रस्तावावर मा.अति आयुक्त(३) यांच्या शेरांकनानुसार व मा.अति आयुक्त(२) यांचा अभिप्राय व सोबत सादर केलेल्या यादीनुसार सुरक्षा विभागामार्फत ६६ रखवालदारांचे मदतनीस यांची नियुक्ती करणेबाबत सुरक्षा अधिकारी यांना आदेशित केलेले आहे. त्यानुसार सुरक्षा विभागाकडे सद्यस्थितीत कार्यरत असलेली मे.नॅशनल सिक्युरिटी सर्व्हीसेस या संस्थेस CCC वर सुरक्षा व्यवस्था करणेकामी दि.२७/०८/२०२० ते दि.३१/१०/२०२० पर्यंतच्या खर्चास कार्योत्तर मान्यता देणे आवश्यक आहे. तसेच सुरक्षा विभागामार्फत कोविड केअर सेंटर वर यापुर्वीच ४६ रखवालदारांचे मदतनीस यांचे दि.०१/०९/२०२० ते दिनांक ३१/१०/२०२० या कालावधीकरीता मा.स्थायी समिती सभा दिनांक १२/०८/२०२० रोजी ठराव क्रमांक ७२९५ अन्वये ३१/०८/२०२० रोजी पर्यंत येणा-या खर्चास मान्यता देण्यात आलेली असून सदरील कामकाज आजतागात चालू आहे.तरी वर नमुद दोन्ही कामकाजांवरील नियुक्त रखवालदारांचे मदतनीसांचे कामांसाठी प्रति माह प्रति कर्मचारी र.रु.२३,४७१/-प्रमाणे एकूण र.रु.५५,०७,३५६/- (अक्षरी र.रू. पंचावन्न लाख सात हजार तीनशे छपन्न फक्त) ऐवढ्या अपेक्षित खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७४५१ विषय क्रमांक – ०४

दिनांक – १६/०९/२०२० विभाग – आरोग्य मुख्यालय

सुचक – मा.राजेंद्र लांडगे अनुमोदक – मा.अभिषेक बारणे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.आमुका/११/कावि/२३१/२०२०, दि.२८/०८/२०२०

विषय - पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये अस्तित्वात असलेल्या कोविड केअर सेंटर(CCC) खाजगी रुग्णालय सेंटर/एन.जी.ओ./खाजगी संस्था यांना चालविणेस देणेकामी तसेच खाजगी ठिकाणी वरील संस्थामार्फत (CCC) चालविणेस देणेबाबत...

विषय क्र.४ चा विचार दि.२३/०९/२०२० चे सभेचेवेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७४५२ विषय क्रमांक – ०५

दिनांक – १६/०९/२०२० विभाग – वाय.सी.एम.एच.

सुचक – मा.संतोष कांबळे अनुमोदक – मा.अंबरनाथ काबळे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.वायसीएमएच/७/कावि/५८७/२०२०, दि.२९/०७/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाचे यशवंतराव चव्हाण स्मृती रूग्णालयाकरीता अस्थायी स्वरूपातील वरिष्ठ निवासी व कनिष्ठ निवासी डॉक्टरांच्या रिक्त पदांकरीता दि.१७/०७/२०२० रोजीचे Walk In Interview करीता उपस्थीत उमेदवारांमधुन १ वरिष्ठ निवासी व १ कनिष्ठ निवासी उमेदवारांची निवड करणेस शिफारस केलेली आहे. त्यानुसार सोबतचे प्रपत्र अ मध्ये नमुद केलेल्या १ वरिष्ठ निवासी व १ कनिष्ठ निवासी उमेदवारांची दरमहा

एकत्रित मानधनावर तात्पुरत्या स्वरूपात आदेशाचे तारखेपासून पुढे सहा महिनेकरीता नियुक्तीस कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७४५३ विषय क्रमांक – ०६

दिनांक – १६/०९/२०२० विभाग – वाय.सी.एम.एच.

सुचक – मा.अभिषेक बारणे अनुमोदक – मा.राजेंद्र लांडगे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.वायसीएमएच/७/कावि/१३३६/२०२०, दि.२६/०८/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाचे यशवंतराव चव्हाण स्मृती रूग्णालयामध्ये तात्पुरत्या स्वरूपात सहा महिने करीता मानधनावर नेमणुक केलेल्या विविध डॉक्टर पदावरील सध्या कार्यरत असलेल्या ४३ उमेदवारांची सेवा माहे ऑगस्ट व सप्टेंबर २०२० मध्ये संपुष्टात येत आहे. सध्यस्थितीत संपुर्ण देशात/राज्यात/शहारात कोरोना -१९ या संसर्गजन्य विषाणुचा मोठ्या प्रमाणात वाढता प्रादुर्भाव व त्यामुळे कोरोना बाधीत रूग्णांची वाढती संख्या विचारात घेता पुढील कालावधीसाठी नव्याने जाहिरात प्रकटन प्रसिध्द करून मानधन भरती प्रक्रिया राबविणे शक्य नसल्याने सध्यस्थितीत कार्यरत असलेल्या ४३ डॉक्टर उमेदवारांची रूग्णालयास कोविड-१९ चे कामकाजाकरीता कोविड कालावधीसाठी आवश्यकता असल्याने विविध ४३ डॉक्टर उमेदवारांची सेवा तीन महिनेकरीता अधिग्रहित करणेस कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७४५४ विषय क्रमांक – ०७

दिनांक – १६/०९/२०२० विभाग–करआकारणी व करसंकलन

सुचक – मा.राजेंद्र लांडगे अनुमोदक – मा.शितल शिंदे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.कर/मुख्य/७/कावि/३३१/२०२०, दि.०३/०९/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस विचारात घेवून –

करआकारणी व करसंकलन विभागाकडील निविदा नोटीस क्र.01/2020-2021 अन्वये मे.ऑरिनप्रो सोल्युशनस लि.यांना महापालिका कार्यक्षेत्रातील मिळकतींचे सर्व्हेक्षण करुन सर्व्हेक्षणामध्ये सापडलेल्या नवीन/वाढीव/ वापरात बदल, इत्यादी मिळकतींची माहिती/ यादी (RFP नुसार) प्राप्त झालेनुसार संबंधित विभागीय कार्यालयामार्फत मिळकतकर आकारणीची कार्यवाही पूर्ण करुन मिळकतधारकास देणेत येणा-या मिळकतकर देयकाच्या (बीलाच्या) रकमेवर निविदाधारकास निविदा दर 6.60% दराने कामकाज वाटप करणेस मान्यता तसेच उपरोक्त निविदेप्रमाणे करणेत आलेल्या कामकाजाचे बील करसंकलन विभागाकडील 'मिळकत सर्व्हेक्षण' या लेखाशिर्षामधून खर्ची टाकणेस मान्यता देणेकामी लघुत्तम निविदाधारक मे.ऑरिनप्रो सोल्युशनस लि. यांना कार्यारंभ आदेश देणे, करारनामा करणे, प्रसिध्द निविदेनुसार अनामत रक्कम भरुन घेणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच प्रस्तुत विषयातील " **निविदा दर सर्व करांसह** " हा शब्द वगळणेस मान्यता येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक – ७४५५ विषय क्रमांक – ०८

दिनांक – १६/०९/२०२० विभाग – मध्यवर्ती भांडार

सुचक – मा.शितल शिंदे अनुमोदक – मा.संतोष कांबळे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.मभां/५/कावि/८२४/२०२०, दि.०३/०९/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाचे विविध विभागास आवश्यक छपाई साहित्य खरेदीकामी ई.नि.सु.क्र.30/2019-20 अन्वये मागविण्यात आलेल्या निविदांमध्ये लघुत्तम निविदाकार मे.जयगणेश ऑफसेट, पुणे यांचे एकुण 24 बाबींसाठी, मे.आनंद एंटरप्रायजेस, चिंचवड यांचे 58 बाबींसाठी, मे.आशिष एंटरप्रायजेस, चिंचवड यांचे 19 बाबींसाठी व मे.अमृत मुद्रणालय, चिंचवड यांचे 6 बाबींसाठीचे असे एकुण 107 बाबींसाठी दर करारानुसार एक वर्ष कालावधीकरिता एकूण र.रु.1,22,25,173/- (अक्षरी र.रु.एक कोटी बावीस लाख पंचवीस हजार ऐकशे त्र्याहत्तर फक्त) इतका खर्च हॊणार आहे. त्यानुसार ई-निविदा सुचना क्र.30/2019-20 अन्वये दर करारानुसार लघुत्तम दर प्राप्त पुरवठाधारकांकडून पुढील 1 वर्ष कालावधीसाठी विविध विभागांचे मागणीनुसार आवश्यक छपाई साहित्य करारनामा करुन छपाई करुन घेणेकामी व त्यासाठी होणा-या खर्चाला मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७४५६ विषय क्रमांक – ०९

दिनांक – १६/०९/२०२० विभाग – आरोग्य मुख्यालय

सुचक – मा.राजेंद्र लांडगे अनुमोदक – मा.अंबरनाथ कांबळे

संदर्भ – मा.अति. आयुक्त(२) यांचे पत्र क्र.आमुका/३/कावि/२६५/२०२०, दि.०३/०९/२०२०

विषय – पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये अस्तितवात असलेल्या कोविड केअर सेंटर (CCC) खाजगी रुग्णालय सेंटर/एन.जी.ओ./खाजगी संस्था यांना खाजगी जागेमध्ये चालविणेस देणेबाबत.

विषय क्र.९ चा विचार दि.२३/०९/२०२० चे सभेचेवेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७४५७ विषय क्रमांक – १०

दिनांक – १६/०९/२०२० विभाग – भुमि आणि जिंदगी

सुचक – मा.राजेंद्र लांडगे अनुमोदक – मा.संतोष कांबळे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.भूजि/९/कावि/२००/२०२०, दि.३१/०८/२०२०

विषय – मनपाचे यशवंतराव चव्हाण स्मृती रूग्णालय येथे महासंघ मेडिकल स्टोर्ससाठी मुदतवाढ देणेबाबत..

विषय क्र.१० चा विचार दि.२३/०९/२०२० चे सभेचेवेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७४५८ विषय क्रमांक – ११
दिनांक –१६/०९/२०२० विभाग – ह क्षेत्रिय, आरोग्य
सुचक – मा.राजेंद्र लांडगे अनुमोदक – मा.शितल शिंदे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.हक्षे/आ-५/कावि/४१५/२०२०, दि.०५/०८/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ह क्षेत्रीय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील आरोग्य विभागाचे अंतर्गत प्रभाग क्रं २०,३०,३१ व ३२ प्रभागसाठी १३२८ सार्वजनिक शौचालय व मुता-यांची यांत्रिक पध्दतीने (पाण्याचे उच्चदाबाचे सहाय्याने) व मनुष्यबळाद्वारे दैनंदिन साफसफाई, देखभाल व किरकोळ दुरुस्ती करणे या कामासाठा ई टेंडरींग पध्दतीने सेवाशुल्क रकमेवर (ई-निविदा नोटीस क्र.४/२०१८– १९) निविदा मागविण्यात आली होती. त्याअनुषांगाने मे.शुभम उद्योग यांची (-) ९९.०%कमी सर्वात कमी दराची निविदा प्राप्त झालेली आहे. मे.शुभम उद्योग यांना पुन:श्च विचारणा करण्यात आली असता त्यांनी नव्याने (-) १००% कमी दर दिलेला आहे. म्हणजेच निविदा रक्कमेच्या र.रु.१,८६,००,८१६/- पेक्षा (-)९.०९% कमी हा दर प्राप्त झाल्याने मे.शुभम उद्योग यांचे कडून निविदा मंजूर र.रु. १,६९,०९,८२४/- पर्यंत काम करुन घेणे कामी व किमान वेतन दरानुसार वेळोवेळी कर्मचा-याचे वेतनात होणा-या प्रत्यक्ष खर्चास मा.स्थायी समितीचा ठराव क्रं.३४३३ दि.२३/१०/२०१८ अन्वये मान्यता घेण्यात आली आहे. तसेच संबंधीत संस्थेबरोबर दि.२०/११/२०१८ रोजी (१०/१२/२०१८ ते ०९/१२/२०२०) या कालावधी साठी कारार नामा करून घेण्यात आलेला आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे कार्यक्षेत्रा मध्ये कोरोना विषाणूचा संसर्ग व प्रसार मोठया प्रमाणात वाढत असून त्याप्रमाणे रुग्णांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे.मनपाचे ह क्षेत्रिय कार्यालयाचे कार्यक्षेत्रातील प्रभाग क्र.२०,३०,३१ व ३२ मध्ये कोरोना विषाणूचा प्रसार रोखणे करीता युध्दपातळीवर कामकाज करण्यात येत असून कोविड केअर सेंटर व अलगिकरण केंद्र ही निर्माण करण्यात आली आहेत. तसेच कोरोना विषाणूचा प्रसार रोखणे करीता विविध उपाययोजना करण्यात येत असून ह क्षेत्रीय कार्यालयाचे कार्यक्षेत्रातील प्रभाग क्रं.२०,३०,३१ व ३२ मधील मनपाचे शौचालय /मुतां-यांची दिवासातून किमान तीन वेळा तरी यांत्रिक पध्दतीने( पाण्याचे उच्चदाबाचे सहाय्याने) व मनुष्यबळाद्वारे दैनंदिन साफसफाई,देखभाल व किरकोळ दुरुस्ती होणे आवश्यक असल्याने.त्या अनुषांगाने सद्यस्थितीत ज्या ठेकेदरा कडून निविदे नुसार कामकाज चालू आहे. त्यानुसार मे.शुभम उद्योग यांना उपरोक्त प्रभागातील शौचालय /मुतां-यांची दैनंदिन साफसफाई दिवसातून किमान तीन वेळा (म्हणेजच १+२ करणे कामी ) काम करण्यास तयार आहात का ? याबाबत पत्र देवून विचारणा करण्यात आली होती. मे.शुभम उद्योग यांनी त्यांना विचारणा केल्यानुसार सदरचे काम अजून दोन वेळा करण्यास तयार असल्याचे लेखीपत्र दिले असून सदर पत्रा मध्ये मे.शुभम उद्योग यांनी निविदा मंजूर दर (किमान वेतन दरानुसार वेळोवेळी कर्मचा-याचे वेतनात होणा-या बदलानुसार) दराची मागणी केली असून त्यांनी नुसार कोरोनाचा वाढत असलेला उद्रेक व उध्दभवलेली आर्थिक टंचाई आपत्ती सामाजिक भान याचे पिं.चिं.मनपा क्षेत्रात राहात असलेले उत्तर दायित्व स्विकारुन एक वेळ विना मोबदला साफ सफाई निविदा कालावधी संपेपर्यंत (०९/१२/२०२० i.e.३०/११/२०२०) करण्यास तयार असल्याचे नमूद केले आहे.म्हणजेच दिवसातून ( सशुल्क २+ निशुल्क १= ३) या प्रमाणे साफ सफाई करण्यास असल्याचे नमूद केले आहे. सद्यस्थितीत उपरोक्त प्रभाग क्रंमाक नुसार १२७४ शौचालय /मुता-यां यांची साफ सफाई करण्यात येत आहे.त्याचा तपशील पुढील प्रमाणे

| अ.क्रं | प्रभाग क्रमाक | शौचालय संख्या | मुतारी संख्या | पाडण्यात आलेली संख्या शौचालय | मुतारी | सद्यस्थितीतील संख्या |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २० | ५२६ | ११४ | ३० | ० | ६१० |
| २ | ३० | ५१५ | ३८ | १२ | ० | ५४१ |
| ३ | ३१ | १७ | ०६ | ० | ० | २३ |
| ४ | ३२ | ९९ | १३ | १२ | ० | १०० |
| | एकूण | ११५७ | १७१ | ५४ | ० | १२७४ |

किमान वेतन दरानुसार वेळोवेळी कर्मचा-याचे वेतनात होणा-या बदलानुसार वेतन सद्यस्थितीत १२७४ सार्वजनिक शौचालय सिट/मुतारी साफसफाई करीता येणारा खर्च खालील प्रमाणे(कामगार कल्याण अधिकारी यांचे पत्र क्रं.काक/०३/कावि/९४/२०२० दि.१२/२/२०२०)

| अ.क्र | कालावधी | जादा एक वेळ सशुल्क |
|---|---|---|
| १ | ०१/०८/२०२० ते ३०/११/२०२० | १२७४X ६००.७६=७६५३६८<br>७६५३६८ X ४( महिने) = ३०६१४७२/- |
| अ.क्र | कालावधी | जादा एक वेळ निशुल्क |
| १ | ०१/०८/२०२० ते ३०/११/२०२० | १२७४ X ६००.७६ = ७६५३६८ ७६५३६८ X ४( महिने) = ३०६१४७२/- (होणारी बचत र.रु) |

तरी उपरोक्त प्रमाणे दि. /०७/२०२० चे मान्य प्रस्तावा नुसार मे.शुभम उद्योग यांना निविदेचे दरा नुसार जादा एक १वेळ शौचालय/मुता-या साफ सफाई सशुल्कसह येणारा खर्च र.रु.३०,६१,४७२/- व किमान वेतनदरानुसार वेळोवेळी कर्मचा-याचे वेतनात होणा-या प्रत्यक्ष खर्चास त्यांनी दाखविलेल्या तयारीनुसार एकवेळ निशुल्क काम करण्यास दि.०१/०८/२०२० ते दि.३०/११/२०२० पर्यंत काम करुन मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७४५९ विषय क्रमांक – १२
दिनांक –१६/०९/२०२० विभाग – आरोग्य मुख्यालय
सुचक – मा.अंबरनाथ कांबळे अनुमोदक – मा.संतोष कांबळे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.आमुका/४/कावि/३०७/२०२०, दि.०४/०९/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड शहराच्या कार्यक्षेत्रामध्ये सार्वजनिक ठिकाणी पान, तंबाखू, गुटखा खाऊन किंवा त्याशिवायही थुंकल्यास आरोग्य विभागामार्फत थुंकणा-या नागरिकांविरुध्द दंडात्मक कारवाई करण्यात येते. त्याकामी मा.स्थायी समिती सभा ठराव क्र.७२१६ दि.१०/०७/२०२० अन्वये अशा व्यक्तींविरुध्द र.रु.५००/- इतक्या रकमेचा दंड आकारणेस मान्यता देण्यात आलेली आहे. तथापि, मा.विभागीय आयुक्त, पुणे यांनी दि.२८/०८/२०२० रोजीचे आदेशान्वये कोरोना संसर्गजन्य आजाराचा संसर्ग रोखण्यासाठी मुखपट्टी (मास्क) न घालता फिरणा-या नागरिकांना र.रु.५००/- तसेच सार्वजनिक सार्वजनिक ठिकाणी थुंकतांना आढळल्यास र.रु.१०००/- इतक्या रकमेचा दंड आकारण्याचे निर्देश दिलेले आहेत. तसेच दंड आकारणीकामी अनुषंगिक

अधिनियमातील तदतुदी आधारे आदेश पारित करण्याचे महापालिकेस सूचित केलेले आहे. सद्यस्थितीत मनपामार्फत मास्क परिधान न करणा-या व्यक्तींविरुध्द र.रु.५००/- इतक्या रकमेचा दंड आकारण्यात येत असून पिंपरी चिंचवड शहराच्या कार्यक्षेत्रामध्ये सार्वजनिक ठिकाणी थुंकल्यास र.रु.५००/- इतकी रक्कम दंड म्हणून आकारण्यात येत आहे. त्यामुळे मा.विभागीय आयुक्त यांचेमार्फत निर्गत केलेल्या आदेशानुसार सार्वजनिक ठिकाणी थुंकण्यापोटी आकारण्यात येणारी दंडाची रक्कम र.रु.१०००/- इतकी वाढविणे आवश्यक आहे. शहरामध्ये वाढता कोविड–१९ चा प्रादुर्भाव लक्षात घेता नागरिकांमध्ये सार्वजनिक ठिकाणी थुंकण्यास प्रतिबंध करणेकामी सार्वजनिक परिसरामध्ये थुंकणा-या व्यक्तींविरुध्द र.रु.१०००/- इतक्या रकमेचा दंड आकारणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७४६० विषय क्रमांक – १३

दिनांक – १६/०९/२०२० विभाग – वाय.सी.एम.एच.

सुचक – मा.शितल शिंदे अनुमोदक – मा.अभिषेक बारणे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.वायसीएमएच/६/कावि/५३८/२०२०, दि.०३/०९/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

"पी.जी.वायसीएमएच पीसीएमसी मानधनावरील अध्यापक व कर्मचारी मानधन/वेतन" या लेखाशीर्षावर र.रु.३,००,००,०००/- तरतुद केली होती. तसेच सदर "पी.जी.वायसीएमएच पीसीएमसी मानधनावरील अध्यापक व कर्मचारी मानधन/वेतन" या लेखा शिर्षातुन आजपर्यंत र.रु.२,९०,३३,४४३/- इतका खर्च झालेला असून र.रु.९,६६,५५७/- इतकी शिल्लक आहे. सदरची रक्कम पी.जी.आय. अध्यापक व कर्मचारी यांचे मासिक मानधन बिल अदा करणेकामी अपुरी पडणार आहे. माहे ऑगस्ट ते फेब्रुवारी-२०२० चे वेतनाकरीता अंदाजे र.रु.५,००,००,०००/- ची आवश्यकता असून र.रु.९,६६,५५७/- इतकी खर्च झालेली आहे. वाय.सी.एम.एच. कडील "वाय.सी.एम.एच. मधील स्थायी अस्थापना" लेखाशीर्षावर र.रु.७०,००,००,०००/- इतकी तरतुद केलेली आहे. आजअखेर सदर लेखाशीर्षावर र.रु.१४,९८,५७,५२९/- इतकी खर्च झालेली आहे. व र.रु.५५,०१,४२,४७१/- इतकी तरतुद शिल्लक आहे. तरी शिल्लक रक्कमेतुन वाय.सी.एम.एच. कडील "पी.जी.वायसीएमएच पीसीएमसी मानधनावरील अध्यापक व कर्मचारी मानधन/वेतन" या लेखाशीर्षामधील वेतनबिले अदा करणेकामी अंदाजे र.रु.५,००,००,०००/- इतकी तरतुद "स्थायी अस्थापना" या लेखाशीर्षातुन वर्ग करणे शक्य आहे. वर्गीकरणाचा तपशील खालील प्रमाणे.

| लेखाशिर्ष | सन २०२०-२१ करिता एकुण तरतुद | वाढ | घट | वाढ घट करुन होणारी एकुण तरतुद र.रु. |
|---|---|---|---|---|
| **स्थायी आस्थापना** | ७०,००,००,०००/- | | ५,००,००,०००/- | ६५,००,००,०००/- |
| पी.जी.वायसीएमएच पीसीएमसी मानधनावरील अध्यापक व कर्मचारी मानधन/वेतन | ३,००,००,०००/- | ५,००,००,०००/- | | ८,००,००,०००/- |
| | **एकुण** | ५,००,००,०००/- | ५,००,००,०००/- | |

तरी यशवंतराव चव्हाण स्मृति रुग्णालयाचे सन २०२०-२१ चे अंदाजपत्रकातील "स्थायी आस्थापना" या लेखाशीर्षावरील र.रु.५,००,००,०००/- "पी.जी.वायसीएमएच पीसीएमसी मानधनावरील अध्यापक व कर्मचारी मानधन/वेतन" या लेखाशीर्षावर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम १०३ अनुसुची ड मधील प्रकरण् ७ तरतुद २(१) अन्वये वर्ग करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७४६१ | विषय क्रमांक – १४

दिनांक – १६/०९/२०२० | विभाग – स्थापत्य ह मुख्यालय

सुचक – मा.शितल शिंदे | अनुमोदक – मा.अंबरनाथ कांबळे

संदर्भ – मा.कार्यकारी अभियंता यांचे पत्र क्र.स्था/नि/ह-मुख्य/२९४/२०२०, दि.०७/०९/२०२०

मा.कार्यकारी अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या स्थापत्य ह मुख्यालयाकडील सोबत जोडलेल्या प्रपत्र अ (1 ते 1) मधील कामांचे नियमानुसार व निविदा अटी शर्ती प्रमाणे संबंधित ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करुन कामाचे आदेश निर्गत केले असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७४६२ | विषय क्रमांक – १५

दिनांक – १६/०९/२०२० | विभाग – विद्युत मुख्यालय

सुचक – मा.संतोष कांबळे | अनुमोदक – मा.राजेंद्र लांडगे

संदर्भ – मा.अति.आयुक्त(३) यांचे पत्र क्र.विमुका/४/कावि/३२१/२०२०, दि.०८/०९/२०२०

मा.अति.आयुक्त(३) यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या विद्युत विभागाकडील निविदा नोटीस क्र.08-02/2020-2021 अन्वये पिंपरी चिंचवड महानगरपालिका ह क्षेत्रीय कार्यक्षेत्रातील विविध ठिकाणी कोविड-१९ आपत्ती व्यवस्थापन (CCC) करिता प्रकाश व्यवस्था, जनित्रसंच, सी.सी.टीव्ही, व अन्य विद्युत विषयक कामे करणेकामी मे.रियल इलेक्ट्रीकल्स निविदा र.रु.29,03,631/- (अक्षरी र.रु. एकोणतीस लाख तीन हजार सहाशे एकतीस फक्त) पेक्षा -17.10% कमी या ठेकेदाराकडून काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तू व सेवा कर अदा करणेस या अटीस अधीन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७४६३ | विषय क्रमांक – १६

दिनांक – १६/०९/२०२० | विभाग – ब क्षेत्रिय, आरोग्य

सुचक – मा.अभिषेक बारणे | अनुमोदक – मा.अंबरनाथ कांबळे

संदर्भ – मा.क्षेत्रिय अधिकारी यांचे पत्र क्र.बक्षेआ/५/कावि/३२९/२०२०, दि.०९/०९/२०२०

मा.क्षेत्रिय अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे –

ब क्षेत्रीय कार्यालयाअंतर्गत औष्णीक धुरीकरणासाठी रिक्षा टेम्पो भाड्याने घेणेसाठीचे मे.मनिष असोसिएटस यांचे कामाची मुदत दि.31/08/2020 रोजी संपलेने कामास दि.01/09/2020 ते दि.30/11/2020 पर्यंत ३ महीने मुदतवाढ देणेसाठी र.रु.2,25,990/- (अक्षरी र.रू.दोन लाख पंचवीस हजार नऊशे नव्वद फक्त) अपेक्षीत खर्चास व मुदतवाढीस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७४६४ विषय क्रमांक – १७

दिनांक – १६/०९/२०२० विभाग – स्थापत्य EWS/BSUP

सुचक – मा.अंबरनाथ कांबळे अनुमोदक – मा.संतोष कांबळे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.स्था/नि/ EWS/१८७/२०२०, दि.१०/०९/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.11/01/202020-2021 अन्वये शहर झोपडपट्टी पुनर्वसन अंतर्गत मिलिंदनगर येथील प्रकल्पामधील (A2, A3) इमारतीचे स्थापत्य, विद्युत, पाणीपुरवठा, जलनिःसारण विषयक दुरुस्तीची कामे करणेकामी मे.राहूल कन्स्ट्रक्शन नि.र.रू.3,33,97,605/- (अक्षरी र.रु.तीन कोटी तेहत्तीस लाख सत्त्यान्नव हजार सहाशे पाच फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.3,33,45,705/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.3,33,45,705/- पेक्षा 32.01% कमी म्हणजेच र.रु.2,26,71,745/- + रॉयल्टी चार्जेस र.रु.15,012/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.51,900/- = एकुण र.रु.2,27,38,657/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७४६५ विषय क्रमांक – १८

दिनांक – १६/०९/२०२० विभाग – सुरक्षा

सुचक – मा.राजेंद्र लांडगे अनुमोदक – मा.शितल शिंदे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.सुवि/३/कावि/४१९/२०२०, दि.१०/०९/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस विचारात घेवून –

सुरक्षा विभागाकडील ई निविदा सुचना क्र.३/२०१६-१७ अन्वये मे.सैनिक इंटेलिजन्स अँन्ड सिक्युरीटी सर्व्हीसेस प्रा.लि. यांचे मनपा कार्यक्षेत्रातील मनपाचे शाळांचे सुरक्षेकामी ३१६ रखवालदार मदतनीसांच्या कामकाजाचा कालावधी दिनांक १५/०८/२०२० रोजी समाप्त होणार आहे. सदर संस्थेचे कामकाज करारनाम्यातील अटी शर्तीनुसार सुरू आहे. तसेच सुरक्षा विभागाकडून ई निविदा नोटीस क्रमांक २/२०१९-२० https://mahatenders.gov.inया संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. नवीन निविदेचे कामकाज चालू आहे. पात्र निविदाधारकास कामकाज आदेश निर्गत होईपर्यंत निविदेच्या कामकाजास २ ते ३ महिन्याचा कालावधी लागण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच ई निविदा सुचना क्र.३/२०१६-१७ या निविदेच्या कामकाजाची मुदत

दिनांक १५/०८/२०२० रोजी संपुष्ठात येत असल्याने व नवीन निविदा प्रक्रियासाठी लागणारा वेळ तसेच सद्यस्थितीमध्ये कोरोना विषाणू (कोविड-१९) चा प्रादुभार्व पाहतात व सुरक्षेचे कामकाज अतिमहत्वाचे असल्याने सदर कामकाजास पुढील अडीच महिने कालावधी करिता मुदतवाढ देणे आवश्यक आहे. त्यानुसार सदर कामकाजास १६/०८/२०२० ते ३१/१०/२०२० (अडीच महिने) या कालावधीकरीता किंवा निविदा प्रकीया पुर्ण होऊन निविदाधारकास आदेश देईपर्यंत यापैकी जे आधी घडले याप्रमाणे मुदतवाढ देणे आवश्यक आहे. तथापी मा. स्थायी समिती यांचे मान्यतेने नविन करारनामा करणेत येऊन त्यानुसार कामाची नव्याने अनामत रक्कम घेणेत येऊन पुढील आदेश निर्गत होईपर्यंत मुदतवाढ देणे व कामगार कल्याण अधिकारी यांचे कडील पत्र क्र.काक/३/कावि/९६/२०२० दिनांक १३/०२/२०२० अन्वये नविन किमान वेतन दरानुसार अकुशल कामगारांचे मुळ वेतन र.रू.११,५००/- व महागाई भत्ता र.रू.५२५०/- प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे किमान वेतन अदा करणेस व या पुढे जानेवारी व जुलैमध्ये होणा-या किमान वेतन वाढीस कामगार कल्याण विभागाने कळविल्या प्रमाणे प्रत्यक्ष त्या तारखेपासून दरवाढ लागू करणेस, कामकाजाचे आदेश देणेबाबत व त्यापोटी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेबाबत मा.आयुक्त यांची मागणी असती तरी, प्रस्तुत कामास दि.१६/०८/२०२० पासून सहा महिने किंवा नविन निविदाप्रक्रीया अंतीम होवून कामाचे आदेश देणे यापैकी आधी घडेल त्या कालावधीसाठी मुदतवाढ देण्यास व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

| | |
|---|---|
| ठराव क्रमांक – ७४६६ | विषय क्रमांक – १९ |
| दिनांक – १६/०९/२०२० | विभाग – सुरक्षा |
| सुचक – मा.राजेंद्र लांडगे | अनुमोदक – मा.शितल शिंदे |

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.सुवि/३/कावि/४१८/२०२०, दि.१०/०९/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस विचारात घेवून –

सुरक्षा विभागाकडील ई निविदा सुचना क्र.२/२०१६-१७ अन्वये मे.नॅशनल सिक्युरीटी सर्व्हीसेस यांचे मनपाचे मिळकतींचे सुरक्षेकामी ८८२ रखवालदार मदतनीसांच्या कामकाजाचा कालावधी दिनांक १५/०८/२०२० रोजी समाप्त होणार आहे. सदर संस्थेचे कामकाज करारनाम्यातील अटी शर्तीनुसार सुरू आहे. तसेच सुरक्षा विभागाकडून ई निविदा नोटीस क्रमांक २/२०१९-२० https://mahatenders.gov.inया संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. नवीन निविदेचे कामकाज चालू आहे. पात्र निविदाधारकास कामकाज आदेश निर्गत होईपर्यंत निविदेच्या कामकाजास २ ते ३ महिन्याचा कालावधी लागण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच ई निविदा सुचना क्र.२/२०१६-१७ या निविदेच्या कामकाजाची मुदत दिनांक १५/०८/२०२० रोजी संपुष्ठात येत असल्याने व नवीन निविदा प्रक्रियासाठी लागणारा वेळ तसेच सद्यस्थितीमध्ये कोरोना विषाणू (कोविड-१९) चा प्रादुभार्व पाहतात व सुरक्षेचे कामकाज अतिमहत्वाचे असल्याने सदर कामकाजास पुढील अडीच महिने कालावधी करिता मुदतवाढ देणे. त्यानुसार सदर कामकाजास १६/०८/२०२० ते ३१/१०/२०२० (अडीच महिने) या कालावधीकरीता किंवा निविदा प्रकीया पुर्ण होऊन निविदाधारकास आदेश देईपर्यंत यापैकी जे आधी घडले याप्रमाणे मुदतवाढ देणे आवश्यक आहे. तथापी मा. स्थायी समिती यांचे मान्यतेने नविन करारनामा करणेत येऊन त्यानुसार कामाची नव्याने अनामत रक्कम घेणेत येऊन पुढील आदेश निर्गत होईपर्यंत मुदतवाढ देणे व कामगार कल्याण अधिकारी यांचे कडील पत्र क्र.काक/३/कावि/९६/२०२० दिनांक १३/०२/२०२० अन्वये नविन किमान वेतन दरानुसार अकुशल कामगारांचे मुळ

वेतन र.रू.११,५००/- व महागाई भत्ता र.रू.५२५०/- प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे किमान वेतन अदा करणेस व या पुढे जानेवारी व जुलैमध्ये होणा-या किमान वेतन वाढीस कामगार कल्याण विभागाने कळविल्या प्रमाणे प्रत्यक्ष त्या तारखेपासून दरवाढ लागू करणेस, कामकाजाचे आदेश देणेबाबत व त्यापोटी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेबाबत मा.आयुक्त यांची मागणी असली तरी, प्रस्तुत कामास दि.१६/०८/२०२० पासून सहा महिने किंवा नविन निविदा प्रक्रिया अंतिम होवून कामाचे आदेश देणे यापैकी आधी घडेल त्या कालावधीसाठी मुदतवाढ देणेस व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७४६७ विषय क्रमांक – २०

दिनांक – १६/०९/२०२० विभाग – सुरक्षा

सुचक – मा.राजेंद्र लांडगे अनुमोदक – मा.शितल शिंदे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.सुवि/३/कावि/४१७/२०२०, दि.११/०९/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस विचारात घेवून –

सुरक्षा विभागाकडील ई निविदा सुचना क्र.१/२०१६-१७ अन्वये मे.क्रिस्टल इंटिग्रेटेड सर्व्हीसेस प्रा.लि.यांचे ठेकेदारी पध्दतीने मनपा कार्यक्षेत्रात ट्रॅफीक पोलिसांचे मदतीसाठी १५० ट्रॅफिक वार्डन मदतणीस पुरविण्याचे कामकाजाचा कालावधी दिनांक १५/०८/२०२० रोजी समाप्त होणार आहे. सदर संस्थेचे कामकाज करारनाम्यातील अटी शर्तीनुसार सुरू आहे. तसेच सुरक्षा विभागाकडून ई निविदा नोटीस क्रमांक १/२०१९-२० https://mahatenders.gov.inया संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात असून नवीन निविदेचे कामकाज चालू आहे. पात्र निविदाधारकास कामकाज आदेश निर्गत होईपर्यंत निविदेच्या कामकाजास २ ते ३ महिन्याचा कालावधी लागण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच ई निविदा सुचना क्र.१/२०१६-१७ या निविदेच्या कामकाजाची मुदत दिनांक १५/०८/२०२० रोजी संपुष्ठात येत असल्याने व नवीन निविदा प्रक्रियासाठी लागणारा वेळ तसेच सद्यस्थितीमध्ये कोरोना विषाणू (कोविड-१९) चा प्रादुभार्व पाहतात व सुरक्षेचे कामकाज अतिमहत्वाचे असल्याने सदर कामकाजास पुढील दोन महिने कालावधी करिता मुदतवाढ देणे आवश्यक आहे. त्यानुसार सदर कामकाजास १६/०८/२०२० ते ३१/१०/२०२० (अडीच महिने) या कालावधीकरीता किंवा निविदा प्रकीया पुर्ण होऊन निविदाधारकास आदेश देईपर्यंत यापैकी जे आधी घडले याप्रमाणे मुदतवाढ देणे आवश्यक आहे. तथापी मा. स्थायी समिती यांचे मान्यतेने नविन करारनामा करणेत येऊन त्यानुसार कामाची नव्याने अनामत रक्कम घेणेत येऊन पुढील आदेश निर्गत होईपर्यंत मुदतवाढ देणे व कामगार कल्याण अधिकारी यांचे कडील पत्र क्र.काक/३/कावि/९६/२०२० दिनांक १३/०२/२०२० अन्वये नविन किमान वेतन दरानुसार अकुशल कामगारांचे मुळ वेतन र.रू.११,५००/- व महागाई भत्ता र.रू.५२५०/- प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे तसेच या पुढे जानेवारी व जुलैमध्ये होणा-या किमान वेतन वाढीस कामगार कल्याण विभागाने कळविल्या प्रमाणे प्रत्यक्ष त्या तारखेपासून दरवाढ लागू करणेस, कामकाजाचे आदेश देणेबाबत व त्यापोटी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेबाबत मा.आयुक्त यांची मागणी असली तरी, प्रस्तुत कामास दि.१६/०८/२०२० पासून सहा महिने किंवा नविन निविदा प्रक्रिया अंतिम होवून कामाचे आदेश देणे यापैकी आधी घडेल त्या कालावधीसाठी मुदतवाढ देणेस व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७४६८ विषय क्रमांक – २१

दिनांक – १६/०९/२०२० विभाग – पाणीपुरवठा

सुचक – मा.राजेंद्र लांडगे अनुमोदक – मा.शितल शिंदे

संदर्भ – मा.कार्यकारी अभियंता यांचे पत्र क्र.पापु/८/कावि/५४९/२०२०, दि.११/०९/२०२०

मा.कार्यकारी अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या पाणीपुरवठा विभागाकडील प्रस्तावा सोबतच्या प्रपत्र “अ” (०१ ते ०३) मधील निविदा कामांचे अवलोकन होवुन नियमानुसार व निविदा अटीशर्ती प्रमाणे तसेच भाववाढ कलमानुसार भाववाढ देय असल्यास मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/ वसुल करणे बंधनकारक राहिल या अटीस अधिन राहून ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करुन कामाचे आदेश निर्गत केले असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७४६९ विषय क्रमांक – २२

दिनांक – १६/०९/२०२० विभाग – स्थापत्य मुख्यालय

सुचक – मा.अंबरनाथ कांबळे अनुमोदक – मा.संतोष कांबळे

संदर्भ – मा.अति.आयुक्त(१) यांचे पत्र क्र.स्था/श.अ./कावि/२१४/२०२०, दि.११/०९/२०२०

मा.अति.आयुक्त(१) यांनी शिफारस केलेप्रमाणे –

स्थापत्य मुख्यालयामार्फत पिंपरी चिंचवड महानगरपालिका अंतर्गत करण्यात येणारे इमारत बांधकाम, लँडस्केपिंग, इंटेरिअर डिझायनिंग व इतर विकास प्रकल्पाच्या कामाकरिता नि.नो.क्र.२४/१/२०१७-१८ अन्वये Expression of Interest ची निविदा प्रसिध्द करणेत आली होती. त्यास अनुसरुन टप्पा-१ मध्ये एकुण ३७ व टप्पा-२ मध्ये एकुण १० इच्छुक सल्लागारांना सहभागी करुन घेणेत आलेले आहे. टप्पा-३ मध्ये वास्तुविशारद मे.ॲक्चुअल आर्किटेक्चर यांचे कामाचे वर्गवारी प्रमाणे प्रपत्र – अ (इमारत बांधकाम विषयक कामे) श्रेणी III व प्रपत्र – ब (लँडस्केपींग विषयक कामे) श्रेणी III, तसेच प्रपत्र – क (इंटेरिअर डिझायनिंग विषयक कामे) श्रेणी III, याप्रमाणे प्रपत्र-अ, ब व क तयार करणेत आले आहे. टप्पा-३ मधील प्रपत्र–अ, ब व क याप्रमाणे वास्तुविशारद मे.ॲक्चुअल आर्किटेक्चर यांना पॅनेलवर घेणेसाठी मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७४७० विषय क्रमांक – २३

दिनांक – १६/०९/२०२० विभाग – आकाशचिन्ह परवाना

सुचक – मा.अभिषेक बारणे अनुमोदक – मा.राजेंद्र लांडगे

संदर्भ – मा.सहा.आयुक्त(परवाना) यांचे पत्र क्र.आप/६/कावि/३८४/२०२०, दि.११/०९/२०२०

मा.सहा.आयुक्त(परवाना) यांनी शिफारस केलेप्रमाणे –

आकाशचिन्ह परवाना विभागातील सहाय्यक आयुक्त यांचे वाहन क्र.MH-14 AE - 8177 (अँम्बेसिडर) या वाहनाचे टायरटयुब खराब झालेने नवीन टायरटयुब खरेदी करणेकामी मे.दर्शन टायर्स चिंचवड., पुणे यांचेकडून

थेट पध्दतीने करारनामा न करता खरेदी केलेले आहेत. त्याकामी आलेल्या प्रत्यक्ष खर्च र.रु.१९,३२५/- (अक्षरी र.रु.एकोणवीस हजार तीनशे पंचवीस फक्त) यास कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७४७१ विषय क्रमांक – २४

दिनांक – १६/०९/२०२० विभाग – विद्युत यांत्रिकी

सुचक – मा.शितल शिंदे अनुमोदक – मा.संतोष कांबळे

संदर्भ – मा.सह शहर अभियंता(वि/यां) यांचे पत्र क्र.मु.पु.र/वि/चिं/१५१/२०२०, दि.०८/०९/२०२०

मा.सह शहर अभियंता(वि/यां) यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड मनपाचे मुंबई-पुणे रस्ता विभाग अंतर्गत मयुर हॉटेल, चिंचवड परीसरातील स्ट्रीटलाईटसाठी वीजपुरवठा मिळण्याकरीता म.रा.वि.वि.कं.लि.यांस मागणी केले असता यांचेकडुन खालील प्रमाणे कोटेशन प्राप्त झाले आहे.

| अ.क्र. | वीजबीलाचे ठिकाण | ग्राहक क्र. | फार्म कोटेशन क्र.व दि. | निव्वळ देय रक्कम |
|---|---|---|---|---|
| 1 | मनपा स्ट्रीट लाईट मयुर हॉटेल चिंचवड मु.पु.रोड. | 170104876261 | 27153578 दि.29/7/2020 | 21081/- |
| एकुण र.रु. | | | | 21081/- |

सबब मुंबई-पुणे रस्त्यावरील मयुर हॉटेल, चिंचवड येथील स्ट्रीटलाईट करीता वीजमीटर द्वारे वीजपुरवठा करणेकामी म.रा.वि.वि.कं.लि.यांस यांस एकुण र.रु.21,081/- (अक्षरी र.रु. एकवीस हजार एक्याऐंशी रुपये फक्त) तातडीने भरणेकामी मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७४७२ विषय क्रमांक – २५

दिनांक – १६/०९/२०२० विभाग – वाय.सी.एम.एच.

सुचक – मा.अंबरनाथ कांबळे अनुमोदक – मा.अभिषेक बारणे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.वायसीएमएच/७/कावि/१४५५/२०२०, दि.०९/०९/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाचे यशवंतराव चव्हाण स्मृती रूग्णालयात कोविड-१९ चे कामकाजाकरीता नव्याने एचडीयु व आयसीयु विभाग सुरू करणेत येणार असल्याने त्याकरीता दरमहा एकत्रित मानधनावर तात्पुरत्या स्वरूपात ५६ वैद्यकिय अधिकारी आय.सी.यु व १० कनिष्ठ निवासी दंतरोग पदे सहा महिने कालावधीकरीता भरणेकामी वर्तमानपत्रात व मनपा वेबसाईटवर जाहिरात प्रसिध्द करून प्राप्त उमेदवारांमधून उमेदवारांची गुणाणुक्रमे व आरक्षणानुसार निवड करणेत आलेली आहे. निवड झालेल्या ५६ वैद्यिकय अधिकारी आयसीयु व १० कनिष्ठ निवासी दंतरोग असे एकूण ६६ उमेदवारांना दिलेल्या नियुक्तीस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७४७३ विषय क्रमांक – २६
दिनांक – १६/०९/२०२० विभाग – वाय.सी.एम.एच.
सुचक – मा.संतोष कांबळे अनुमोदक – मा.अभिषेक बारणे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.वायसीएमएच/७/कावि/१४२५/२०२०, दि.०४/०९/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाचे यशवंतराव चव्हाण स्मृती रूग्णालयाकरीता दरमहा एकत्रित मानधनावर तात्पुरत्या स्वरूपात स्टाफनर्स, ब्लॅड बॅक टेक्निशियन, ब्लॅड बॅक कौन्सीलर, एम.एस.डब्ल्यु, डायलेसिस टेक्निशियन, डाटाएंट्री ऑपरेटर, फार्मासिस्ट, एक्स-रे टेक्नशियन, लॅब टेक्निशियन, पुरूषकक्ष मदतनीस व स्त्रीकक्ष मदतनीस ही पदे सहा महिने कालावधीकरीता भरणेकामी वर्तमानपत्रात व मनपा वेबसाईटवर जाहिरात प्रकटन क्र.१५२/२०१९ प्रसिध्द करून प्राप्त उमेदवारांच्या लेखी परिक्षा घेऊन त्यामधुन गुणवत्ता व आरक्षणानुसार निवड झालेल्या तसेच कोविड कामकाजासाठी नव्याने मंजुर केलेल्या वाढीव उमेदवारांची नियुक्ती करणेत आलेली आहे. परंतु नियुक्ती आदेशातील विहित मुदतीत रूजू न झालेले व रूजू होऊन मध्येच सेवा सोडून गेलेल्या उमेदवारांच्या रिक्त जागी माहे २१ ऑगस्ट २०२० अखेर Walk In Interview व्दारे निवड झालेल्या फार्मासिस्ट-१, लॅब टेक्निशियन-२ व २१ स्टाफनर्स असे एकूण-२४ उमेदवारांची निवडयादी सोबतचे प्रपत्र अ मध्ये सादर केली आहे त्यास कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७४७४ विषय क्रमांक – २७
दिनांक – १६/०९/२०२० विभाग – वाय.सी.एम.एच.
सुचक – मा.संतोष कांबळे अनुमोदक – मा.अंबरनाथ कांबळे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.वायसीएमएच/७/कावि/१४५३/२०२०, दि.०९/०९/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाचे यशवंतराव चव्हाण स्मृती रूग्णालयाकरीता अस्थायी स्वरूपातील वरिष्ठ निवासी, कनिष्ठ निवासी व वैद्यकिय अधिकारी सी.एम.ओ डॉक्टरांच्या रिक्त पदांकरीता दि.०५/०८/२०२० ते दि.०३/०९/२०२० अखेर Walk In Interview करीता उपस्थीत उमेदवारांमधुन वरिष्ठ निवासी -५, कनिष्ठ निवासी-१ व सी.एम.ओ-१ उमेदवारांची निवड करणेस शिफारस केलेली आहे. त्यानुसार सोबतचे प्रपत्र अ मध्ये नमुद केलेल्या वरिष्ठ निवासी-५, कनिष्ठ निवासी-१ व सी.एम.ओ-१ उमेदवारांची दरमहा एकत्रित मानधनावर देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७४७५ विषय क्रमांक – २८
दिनांक – १६/०९/२०२० विभाग – पाणीपुरवठा मुख्यालय
सुचक – मा.अभिषेक बारणे अनुमोदक – मा.शितल शिंदे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.पापु/मुख्य/१०९/२०२०, दि.११/०९/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पवना धरणापासून से.क्र.२३ जलशुध्दीकरण केंद्र निगडी पर्यंत पाणी आणणेसाठी थेट पाईपलाईन टाकणेकामी १८०० मि.मी. व्यासाच्या दोन समांतर पाईपलाईन व हेडवर्क्स आदी कामे करणेकामी मे.एनसीसी-

एसएमसी-इंदू(जेव्ही) यांना प्रकल्पाचे काम दि.३०/०४/२००८ रोजीच्या आदेशान्वये देण्यात आले होते. सदर प्रकल्पासाठी प्रोजेक्ट मॅनेजमेंट कन्सलटन्ट म्हणून मे.युनिटी कन्सलटन्ट प्रा. लि. (नविन नाव मे.युनिटी आय ई वर्ल्ड प्रा. लि.) हे आहेत. कामाची मूळ मुदत २४ महिने म्हणजेच दि.२९/०४/२०१० पर्यंत होती.या कामांतर्गत ठेकेदारामार्फत एकूण ६९.६९ कि.मी.पैकी ३४.७१ कि.मी.लांबीचे पाईप पुरविण्यात आले आहेत.म.न.पा.हद्दीत ६.४ कि.मी.पैकी ४.४ कि.मी. अंतरामध्ये ८.८ कि.मी. लांबीच्या १८०० मि. मी. व्यासाच्या दोन समांतर जलवाहिन्या टाकण्यात आलेल्या आहेत. दि.०९/०८/२०११ रोजी झालेल्या आंदोलनप्रसंगी झालेल्या गोळीबारानंतर कायदा व सुव्यवस्थेच्या कारणास्तव काम बंद करणेची विनंती मा.जिल्हादंडाधिकारी यांनी केली. त्यानंतर त्या तारखेपासून काम बंद आहे. सद्यस्थितीत काम बंद असलेने दि. २५/०३/२०१९ रोजी ठेकेदाराने Termination noticeदिली. त्यानंतर थेट पाईपलाईन टाकणेच्या कामास दि.३१/१२/२०१९ पर्यंत मुदतवाढ देणेत आली. सदर कामाबाबत भारतीय किसान संघटना व इतर ग्रामस्थ यांनी मा.उच्च न्यायालय मुंबई येथे याचिका दाखल केली होती.परंतु सदर याचिका मा.उच्च न्यायालय मुंबई यांनी दि.१९/१०/२०१० रोजी फेटाळलेली आहे.परंतु त्या नंतरही विविध संघटना व स्थानिक नागरिक यांनी सदरचे काम करणेबाबत विरोध दर्शविला तसेच दि.०९/०८/२०११ रोजी मुंबई- पुणे द्रुतगती मार्गावर बउर येथे या प्रकल्प विरोधात झालेल्या रास्ता रोकोच्या आंदोलन प्रसंगी पोलीस गोळीबारात ३ शेतकऱ्यांचा दुर्दैवी मृत्यू झाल्याने दि.१०/०८/२०११ पासून मा.जिल्हा दंडाधिकारी पुणे यांचे आदेशानुसार जिल्ह्याची कायदा व सुव्यवस्था परिस्थिती अबाधित ठेवण्यासाठी सदरचे काम बंद करण्यात आले .या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण (MWRRA)चा निकाल लागल्यानंतर पुढील निर्णय घेण्यात येईल असे तत्कालीन मा.मुख्यमंत्री ,महाराष्ट्र राज्य यांनी सांगितले . दि.१५/०८/२०११ रोजी सर्किट हाउस पुणे येथे सदरचे काम सन २०११ मध्ये पवना गोळीबार झाल्यापासून बंद आहे.सदरचे काम चालू करणेबाबतचा निर्णय मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचेकडून अद्याप प्रलंबित आहे. दरम्यान मनपातर्फे शासनाकडे काम पुनचः चालू करणेबाबत पाठपुरावा सुरू आहे. याबाबत शासन स्तरावर सकारात्मक हालचाली सुरू आहेत. शासन स्तरावर सकारात्मक हालचाली सुरू असल्यामुळे पाणीपुरवठा विभागाने संबंधित ठेकेदार मे.एनसीसी-एमसीसी-इंदू(जेव्ही) यांना दि.२४/०२/२०२० च्या पत्रान्वये काम पुनचः चालू करणेबाबत विचारणा केली असता ठेकेदाराने दि.२५/०४/२०२० रोजीच्या पत्रान्वये सदर काम पुनश्चः चालू करणेस काही अटी व शर्तीसह सकारात्मक प्रतिसाद दिलेला आहे. त्याअनुषंगाने दि.११/०८/२०२० रोजी मा. आयुक्त पिं.चि. मनपा यांच्या दालनात त्यांच्या अध्यक्षतेखाली विषयांकित पवना थेट पाईपलाईन प्रकल्पाचे काम पुनश्चः चालू करणेकामी बैठक झाली. सदर बैठकीस मा. आमदार (भोसरी), ठेकेदाराचे प्रतिनिधी व युनिटी कन्सलटन्ट प्रा. लि. (नविन नाव मे. युनिटी आय ई वर्ल्ड प्रा. लि.) चे श्री.महेश पाठक, श्री.महेशदादा लांडगे, श्री.सुहास मेहता हजर होते. या बैठकीत पवना थेट पाईपलाईन प्रकल्पाचे काम सुरू करणेबाबत सकारात्मक चर्चा झाली. सदर बैठकीचा सभावृत्तांत अवलोकनार्थ सोबत सादर करणेत येत आहे. पवना पाईपलाईनचे काम पुनश्चः सुरू करावयाचे झाल्यास सद्यस्थिती विचारात घेऊन नियोजन करणे गरजेचे आहे. या कामी खालील प्रमाणे कार्यवाही करणे आवश्यक आहे.

१. पुरवठा केलेल्या पाईपची गुणवत्ता तपासणे.
२. पुरवठा केले पंप्स, व्हॉल्व इ. साहित्याची गुणवत्ता तपासणी.
३. यापुर्वी टाकलेल्या पाईपची सद्यस्थिती व गुणवत्ता तपासणी.
४. पवना धरण ते से.क्र.२३ अलायमेंटनुसार Drone Survey करून सद्यस्थिती व आवश्यक नव्याने करावयाची कामे, अडचणी याबाबत सविस्तर प्रस्ताव व Report सादर करणे.

५. सदरचे कामाचा प्रकल्प अहवाल, अंदाजपत्रके तयार करणे.

सदरचे काम पुनश्चः सुरू करावयाचे झाल्यास मा.महापालिका सभेची मान्यता घेणे आवश्यक आहे. त्यामुळे वरील बाबींचा तांत्रिक अहवाल तयार करणे गरजेचे आहे. पवना धरणापासून टाकावयाची पाईपलाईनच्या कामाची यापुर्वी केलेल्या कामाचे सर्वेक्षण, अंदाजपत्रक हे मे. युनिटी कन्सलटन्ट प्रा. लि. यांनी JnNURM अंतर्गत केले होते. सद्यस्थितीत खालील बाबींचा विचार करता संपुर्ण कामाचे नव्याने नियोजन करणे गरजेचे आहे. नवीन प्रकल्प अहवाल करणेची कार्यवाही याच सल्लागाराकडून नवीन शासकीय दराने करणेबाबत मा.आयुक्त यांनी सुचना दिलेल्या आहेत. काम पुनश्च सुरु करावयाचे झालेस सल्लागाराची पुन्हा नेमणूक करणे आवश्यक असल्याची कारणे पुढील प्रमाणे आहेत.

१) मनपाकडे मनुष्यबळ कमी आहे. त्यामुळे सदर प्रकल्पाकरिता सात्यत्याने देखरेख करणेसाठी स्टाफ लागणार आहे.

२) यापूर्वीचे काम/निविदा हि १३ वर्षांपूर्वी काढणेत आले होती. सदर दराने काम करणे योग्य होणार नाही.

३) यापूर्वी केलेले कामाचे र.रु.७५ कोटीचे बिले व क्लेम दिले खेरीज काम करणे शक्य होणार नाही, असे ठेकेदार यांनी कळविले आहे. सदर क्लेम अभ्यास करून योग्य तेच देयके देणेकामी सल्लागार आवश्यकआहे.

